**प्रादेशिक हवामान पूर्वानुमान केंद्र, मुंबई आणि डॉ. बाळासाहेब सावंत कोंकण कृषि विद्यापीठ, दापोली**

**हवामानावर आधारीत कृषि सल्ला (ठाणे व पालघर जिल्हा)**

**(०२३५८) २८२३८७**

**अंक ८०/२०१८** **दिनांक ०५/१०/२०१८** **कालावधी ५ दिवस**


**डॉ. सुभाष चव्हाण,**
विभाग प्रमुख,
कृषिविदया विभाग
९४२२४३१०६७

**डॉ. विजय मोरे,**
नोडल ऑफिसर,
कृषिविदया विभाग
९४२२३७४००१

**डॉ. शितल यादव,**
तांत्रिक अधिकारी
कृषिविदया विभाग
८३७९९०११६०


| मागील हवामान आठवडा सारांश (दिनांक ०१/१०/२०१८ ते ०५/१०/२०१८) | | | | | हवामानाचे घटक | हवामान पूर्वानुमान (दिनांक ०६/१०/२०१८ सकाळी ८:३० पासून १०/१०/२०१८ सकाळी ८:३० वाजेपर्यंत) | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ०१/१० | ०२/१० | ०३/१० | ०४/१० | ०५/१० | | ०६/१० | ०७/१० | ०८/१० | ०९/१० | १०/१० |
| - | - | - | - | - | **पाऊस (मिमी)** | १ | १ | १ | २ | ६ |
| - | - | - | - | - | **कमाल तापमान (अं.से)** | ३४ | ३५ | ३५ | ३४ | ३३ |
| - | - | - | - | - | **किमान तापमान (अं.से)** | २६ | २६ | २६ | २५ | २४ |
| - | - | - | - | - | **मेघाच्छादन (ऑक्टा)** | ६ | ६ | ८ | ८ | ७ |
| - | - | - | - | - | **सकाळची सापेक्ष आर्द्रता** | ७८ | ७६ | ७५ | ८५ | ९१ |
| - | - | - | - | - | **दुपारची सापेक्ष आर्द्रता** | ५३ | ४९ | ५१ | ५१ | ६७ |
| - | - | - | - | - | **वाऱ्याचा वेग (किमी/तास)** | ८ | ९ | ८ | ६ | ५ |
| - | - | - | - | - | **वाऱ्याची दिशा** | ईशान्य-पूर्व | आग्नेय | ईशान्य | पूर्व | पूर्व |

| पाऊस (मिमी) मागील आठवडयातील | पाऊस (मिमी) १/१/२०१८ पासून आजपर्यंत | पाऊस (मिमी) गेल्या वर्षीचा |
|---|---|---|
| ०.० | २३५९.६ | २८३४.२ |

## हवामान पूर्वानुमान कृषि सल्ला

**दिनांक ६ ते १० ऑक्टोबर २०१८ पर्यंत हलक्या स्वरूपाच्या पावसाची शक्यता आहे. दिनांक ६ ते १० ऑक्टोबर २०१८ पर्यंत आकाश मेघाच्छादित राहील.**

| पिक | अवस्था | कृषि सल्ला |
|---|---|---|
| भात | दाणे भरण्याची अवस्था ते पक्वता | • गरव्या जातीचे भात पसवून दाने भरण्याच्या अवस्थेत असल्याने भात खाचरात पाण्याची पातळी ५ से. मी. पर्यंत ठेवावी.<br>• निमगरवे भात पक्व होवू लागल्यास कापणी करण्यापुर्वी ८ ते १० दिवस शेतातील पाणी काढून टाकावेत. |
| वाल/ कडवा वाल | पेरणी | • वालाची भात कापणी नंतर जमिनीच्या अंगओल्यावर विनामशागत पेरणी करण्यासाठी भात काढणीनंतर लगेच शेतातील तणांचे ग्लायफोसेट ५ मि. ली. प्रति लिटर पाण्यातून फवारणी करावी. त्यानंतर कोणतीही मशागत न करता टोकन पद्धतीने दोन ओळीत ३० X १५ से.मी. अंतर ठेवून वालाची पेरणी करावी. पेरणी करते वेळी बियाण्याशेजारी भोक करून त्यामध्ये दाणेदार मिश्रखत गुंठ्यास एक किलो या प्रमाणे द्यावेत. |
| आंबा | पालवी | • आंबा बागेमध्ये जुन्या अनुत्पादित झाडांची मध्य फांदीची छाटणी व इतर फांद्याची विरळणी करावी. |
| नारळ | -- | • पाऊसाचे प्रमाण कमी असल्याने नारळ बागेत पाणी देण्याची व्यवस्था करावी. |
| भाजीपाला फळबाग रोपवाटिका | फळधारणा | • वाऱ्याचा वेग जास्त असल्याने भाजीपाला पिकास भर द्यावी आणि काठीचा आधार द्यावा.<br>• वांगी पिकामध्ये शेंडा व फळे पोखरणाऱ्या अळीचा प्रादुर्भाव दिसून येताच त्याच्या व्यवस्थापनासाठी कीडग्रस्त फळे जमा करून नष्ट करावीत. तसेच फेनव्हलरेट १ मि. ली. प्रति लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी.<br>• भेंडी भाजीपाला पिकावरील पांढऱ्यामाशीच्या नियंत्रणासाठी शेतामध्ये पिवळ्या रंगाची चिकट कार्डे ८ प्रति एकर लावावीत.<br>• रब्बी हंगामासाठी रोपे तयार करण्याकरिता ३ मी. लांब X १ मी. रुंद X १५ से.मी. उंचीच्या गादीवाफ्यावर प्रती चौरस मीटर ५ किलो शेणखत, ३५ ग्रॅम युरिया, १०० ग्रॅम सिंगल सुपर फॉस्फेट व २५ ग्रॅम म्युरेट ओफ पोटेश मिसळून भाजीपाला बियाणांची पेरणी करावी.<br>• भाजीपाला तसेच फळबाग रोपवाटीकेस पाणी देण्याची व्यवस्था करावी. |
| दुभती जनावरे/ शेळ्या/ कुकुटपालन | - | • जनावरांचे, शेळ्यांचे आणि कोंबड्यांचे वाढत्या तापमानापासून संरक्षण करावे.<br>• शेळ्यांमध्ये जंताचा प्रादुर्भाव आढळून येण्याची शक्यता असल्याने अलबेंडाझॉल ७.५ मि. ग्रॅम प्रति किलो वजनास या प्रमाणात औषध द्यावे. |

**सदर कृषि सल्ला पत्रिका डॉ. बाळासाहेब सावंत कोंकण कृषि विद्यापीठ, दापोली येथील ग्रामीण कृषि मौसम सेवा योजनेतील तज्ञ समितीच्या शिफारशीवरून तयार करून प्रसारित करण्यात आली.**

**अधिक माहितीसाठी नजीकच्या कृषी विद्यापीठाचे केंद्र किंवा महाराष्ट्र शासनाचे कृषी अधिकारी यांच्याशी संपर्क करावा.**